महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४१४,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्र ०२२-२२७९३१७१ Email ID : vishi5.hted-mh@mah.gov.in

---

क्र. संकीर्ण २०२३/प्र.क्र. ९७/ वि शि ५ दिनांक -१०/७/२०२३

प्रति,

सर्व कुलसचिव,
**अकृषी विदयापीठे / अभिमत विदयापीठे / स्वयं अर्थसहायीत विदयापीठे**, महाराष्ट्र राज्य.

संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.

संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.

संचालक, कला संचालनालय, मुंबई.

विषय - विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम २०२४ अंतर्गत विद्यार्थ्यांची मतदार यादीमध्ये नाव नोंदणी करणेबाबत

**संदर्भ** - अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी , सा.प्र.विभाग, मंत्रालय यांचे क्र. संकीर्ण २०२३/प्र.क्र. ३८९/२३/३३, दिनांक ३०/६/२०२३ चे पत्र

महोदय,

विषयांकित संदर्भाधीन पत्रामध्ये विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम २०२४ अंतर्गत राज्यातील **सर्व विद्यापीठे** व त्या संलग्न महाविद्यालये / **अभियांत्रिकी महाविदयालये** / तंत्र निकेतन / **अभिमत विद्यापीठे** / **खाजगी विद्यापीठे** येथील विद्यार्थ्यांची मतदार यादीमध्ये मतदार म्हणून नाव नोंदणी करण्याचा उपक्रम राबविण्याबाबत संबंधितांना कळविण्याबाबत निदेशित करण्यात आले आहे. सदरहू पत्र पुढील आवश्यक कार्यवाहीकरिता या सोबत पाठविण्यात येत आहे.

आपला,

सोबत- वरीलप्रमाणे

(शरद कोकाटे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत - कक्ष अधिकारी (कार्यासन ३३) ,सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई

E=6018855

महाराष्ट्र शासन

अ.शा. पत्र क्र.:- संकीर्ण-२०२३/प्र.क्र.३८९/२३/३३
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय
(विस्तार), मदाम कामा मार्ग, हुतात्मा
राजगुरु चौक,
मुंबई -४०० ०३२.
दिनांक:- ३० जून, २०२३.

श्रीकांत देशपांडे
अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी
महाराष्ट्र राज्य

प्रधान सचिव
उच्च व तंत्र शिक्षण
यांचे कार्यालय
क्र. 2754
दि. 08/06/23

**विषय :- विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम, २०२४ अंतर्गत विद्यार्थ्यांची मतदार यादीमध्ये नाव नोंदणी करण्याबाबत.**

**संदर्भ :-** १. भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र. २३/२०२३-ERS (Vol.III), दि.२९.५.२०२३.

२. भारत निवडणूक आयोग यांचे पत्र क्र/४९१.ECI/LET/FUNC/SVEEP-II/Vol/SSR/२०२३, दि.१३.०६.२०२३.

प्रिय विकास,

भारत निवडणूक आयोगाकडून दरवर्षी विशेष संक्षिप्त पुर्नरिक्षण कार्यक्रमांतर्गत अस्तित्वात असलेल्या मतदार यादीची पडताळणी व दूरुस्ती करुन ती त्रुटी विरहीत करण्याचा व दि. १ जानेवारी या अर्हता दिनांकानुसार नविन मतदार नाव नोंदणी करुन मतदार यादी सुधारित करण्याचा कार्यक्रम राबविण्यात येतो. भारत निवडणूक आयोगाने दि.२९.५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम, २०२४ घोषित केलेला आहे.

२. विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम, २०२४ मध्ये दि. १ जानेवारी, २०२४ रोजी १८ वर्षे पूर्ण करणारे नवमतदार यांची नोंदणी करून मतदार यादी सुधारीत करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. तसेच सन २०२४ या वर्षाच्या दि. १ जानेवारी, ०१ एप्रिल, ०१ जुलै व ०१ ऑक्टोंबर अशा चार अर्हता दिनांकानूसार वा त्यापुर्वी १८ वर्ष पुर्ण होणाऱ्या नागरीकांना मतदार यादीमध्ये आगाऊ नाव नोंदणी करता येणार आहे. सदर विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत दि.१७.१०.२०२३ रोजी राज्यातील सर्व विधानसभा मतदारसंघातील प्रारुप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात येणार आहेत व दि.१७.१०.२०२३ ते दि.३०.११.२०२३ या कालावधीत दावे व हरकती (नाव नोंदणीचे अर्ज) स्विकारण्यात येणार आहेत.

Sh Baviskar/SO Tilke
Pl. put up a circular
3/7

उ.स. (सामि/मशि/विशि/नांशि)

३. विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम, २०२४ अंतर्गत राज्यातील सर्व विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे तसेच खाजगी विद्यापीठे व त्यासंलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची मतदार यादीमध्ये मतदार म्हणून नाव नोंदणी करण्याचा पुढील उपक्रम राबविण्याबाबत राज्यातील सर्व विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे तसेच खाजगी विद्यापीठे व त्यासंलग्न महाविद्यालये यांना कळविल्यास मी आपला आभारी राहीन.

१. विद्यापीठ व त्याअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना निवडणूक साक्षरता मंडळामार्फत विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम, २०२४ या कार्यक्रमाची माहिती देण्यात यावी.

विशि-५
6/6.
To
Smt. Baile
5/7/23
6/7/23

२. निवडणूक साक्षरता मंडळामार्फत दि.१७.१०.२०२३ ते दि.३०.११.२०२३ या कालावधीत. दिनांक ०१.०१.२०२४ रोजी १८ वर्षे वय पूर्ण होत असलेल्या विद्यार्थ्यांकडून नवीन मतदार म्हणून नोंदणी अर्ज भरुन घेण्यात यावेत. तसेच दि.०१ एप्रिल, ०१ जुलै व ०१ ऑक्टोंबर या तीन अर्हता दिनांकानूसार १८ वर्षे पूर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांकडूनही आगाऊ नोंदणी अर्ज भरून घ्यावेत. या अर्जांचे संकलन करुन ते संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्याकडे पाठवावेत.

३. राष्ट्रीय सेवा योजना (NSS) व नेहरु युवा केंद्र (NYK) यांच्याशी समन्वय साधून विद्यार्थ्यांची नाव नोंदणी करण्यात यावी.

४. ऑनलाईन माध्यमामार्फत नविन मतदार नोंदणी करण्याबाबत प्रोत्साहित करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात यावेत. निवडणूक साक्षरता बूट कॅम्प, ऑनलाईन प्रश्नमंजुषा स्पर्धा असे विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना मतदार नोंदणी प्रक्रीया. त्याकरिता लागणारी कागदपत्रे इ. ची माहिती मिळण्याच्या दृष्टीने जनजागृती करण्यात यावी.

५. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या प्रवेश करतेवेळी त्यांच्या प्रवेश अर्जामध्ये, विद्यार्थ्याने मतदार यादीत नाव नोंदणी केली आहे किंवा कसे याबाबतचा कॉलम (स्तंभ) समावेश करावा. तसेच ज्या विद्यार्थ्यांची मतदार म्हणून नाव नोंदणी झाली नाही अशा विद्यार्थ्यांची यादी तयार करुन ती संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावी.

६. महाविद्यालयांमधील दि.१.१०.२०२४ रोजी १८ वर्ष पूर्ण होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांची १०० टक्के मतदार नाव नोंदणी करण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी मतदार नोंदणी अधिकारी यांना आवश्यक ते सहकार्य करावे.

७. विद्यापीठ / महाविद्यालय कार्यालयाने संबंधित मतदार नोंदणी अधिकारी कार्यालय/ तहसिल कार्यालयाकडून मतदार नोंदणीसाठी आवश्यक अर्जाचे नमुने उपलब्ध करुन घ्यावेत. विद्यार्थ्यांना विहित नाव नोंदणी अर्ज विद्यापीठ / महाविद्यालयांमध्ये उपलब्ध करुन दयावेत. विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणाऱ्या नाव नोंदणींच्या अर्जाचे संकलन करुन विद्यापीठ / महाविद्यालयाने संबंधित मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाकडे पाठवावे.

आपला स्नेहांकित,

(श्रीकांत देशपांडे)

प्रति,

श्री. विकास चंद्र रस्तोगी
प्रधान सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग